MAHAMUL03014/13/1/2012-TC
Special Issue No.3, Nov.2017

ISSN : Online : 2320-8341
Print : 2320-6446

# RESEARCH FRONT

An International Multidisciplinary Research Journal



# समीक्षा : सिध्दांत आणि व्यवहार

संपादक
प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे
प्रा.डॉ.शिवलिंग मेनकुदळे

**RESEARCH FRONT**
An International Multidisciplinary Research Journal
Special Issue No. 3 Feb. 2018
ISSN :
Online : 2320-8341
Print : 2320-6446

# समीक्षा : सिध्दांत आणि व्यवहार
# SAMIKSHA : SIDDHANT AANI VYAVAHAR

सर्व हक्क संपा. : प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे
प्रा.डॉ.शिवलिंग मेनकुदळे

प्रकाशक : छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २०१८

मुद्रण व अक्षर जुळणी : टाईप इनोव्हेटर्स
१९५ सदाशिव पेठ,वीर सावरकर मार्ग,
सातारा ४१५ ००२
दूरध्वनी : (०२१६२) २३४३७२

मूल्य : रु.३५०/-

('समीक्षा : सिध्दांत आणि व्यवहार' या ग्रंथात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

RESEARCH FRONT
An International Research Journal
ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-8446

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) समीक्षेसमोरील आव्हाने | हरिश्चंद्र थोरात | ९ |
| २) साहित्य समीक्षेची संकल्पना | डॉ.तृप्ती करेकट्टी | २८ |
| ३) नवे विचारप्रवाह आणि समकालीन मराठी समीक्षा | प्रशांत धांडे | ३८ |
| ४) समीक्षेचे प्रयोजन,टेरी इगलटन यांची भूमिका आणि संस्कृती अभ्यासाच्या शक्यता | नितिन जरंडीकर | ५८ |
| ५) नवसमीक्षा | प्रा.रामचंद्र पळे | ७३ |
| ६) शैलीवैज्ञानिक समीक्षा | अंकुश भारत घुले | ७६ |
| ७) उत्तरआधुनिक मराठी कवितेच्या समीक्षेतील अडचणी | डॉ.सुप्रिया आवारे | ८१ |
| ८) पु.शि.रेगे यांच्या 'सावित्री' या कादंबरीची आदिबंधात्मक समीक्षा | डॉ.वर्षा फाटक | ९३ |
| ९) महाभारताचा पौराणिक आशय समृध्द करणारी कादंबरी.....अयोनिजा | प्रा.डॉ.तानाजी पाटील | १०२ |
| १०) आस्वादक समीक्षा आणि ग्रामीण कादंबरी | प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर | १०५ |
| ११) औपन्यासिक समीक्षा | डॉ.भारत खिलारे | ११० |
| १२) शैलीवैज्ञानिक समीक्षा अभ्यासपध्दती : संकल्पना आणि कार्य | श्री. महेशकुमार सोनावणे | १२० |
| १३) साहित्य समीक्षा : स्वरुप विशेष | डॉ.सागर लटके | १३० |
| १४) स्त्रीवादी साहित्य समीक्षा : एक परामर्श | डॉ.प्रीती पाटील | १४० |
| १५) मराठीतील मार्क्सवादी समीक्षाविचार | डॉ.सुभाष पाटील | १४७ |
| १६) मराठी विज्ञानकथांमधील समीक्षात्मक विचार व आधुनिकता | श्री.अजितकुमार पाटील | १५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | स्वातंत्र्योत्तर स्त्रियांची आत्मचरित्रे | नंदकुमार कुंभार | १६ |
| १८) | समकालीन समीक्षा स्वरूप आणि कार्य | प्रा.डॉ.संजय पाटील | १७ |
| १९) | मराठी समीक्षेतील राजकीय व्यवहार | कस्तुरे अनंता | १८ |
| २०) | समकालीन मराठी ग्रामीण कथा समीक्षा व स्वरूप | प्रा.सौ.निर्मला मोरे | १८ |
| २१) | समीक्षेची संकल्पना आणि कार्ये | प्रा.अर्चना मायदेव | १९ |
| २२) | साहित्य समीक्षेचे स्वरूप | डॉ.शिवलिंग मेनकुदळे<br>स्वाती व्हनकडे | १९ |
| २३) | समीक्षेची संकल्पना आणि कार्य | प्रा.डॉ.रमेश पोळ | २० |
| २४) | समीक्षा संकल्पना आणि स्वरूप | डॉ.सविता व्हटकर | २१ |
| २५) | समीक्षेची संकल्पना आणि कार्य-समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीच्या अनुषंगाने | प्रा.डॉ.नितीश सावंत | २१ |
| २६) | समीक्षा संकल्पना व कार्य | शैला क्षिरसागर | २२ |
| २७) | आधुनिकता, उत्तर आधुनिकता समीक्षा आणि आव्हाने | डॉ. अशोक तवर | २३ |
| २८) | तौलनिक साहित्यसमीक्षा : स्वरूप व महत्त्व | प्रा. अशोक शेलार | २४ |
| २९) | वास्तववादाचे स्वरूप | प्रा. डॉ. संजय नगरकर | २५ |
| ३०) | मराठी साहित्य परंपरा व वाटचाल | प्रा.बाळासाो सुतार | २६ |
| ३१) | स्त्रीवादी समीक्षापद्धती आणि त्याचे साहित्यातील उपयोजन | गीता यर्लेकर | २७ |
| ३२) | बा. भ. बोरकर : एक सौंदर्ययात्री | प्रा.डॉ.मानसी लाटकर | २८ |
| ३३) | आंबेडकरवादी समीक्षेतील नवसिद्धांत : बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र | प्रा.गजानन चव्हाण | २८ |
| ३४) | नारायण सुर्वे यांच्या कवितेतील मार्क्सवादी जाणिवा | प्रा.डॉ.सौ.कांचन नलवडे | २९ |
| ३५) | समीक्षा : स्वरूप, विशेष, वाटचाल | प्रा.डॉ.संजयकुमार सरगडे | ३० |
| ३६) | स्त्रीवादी समीक्षा के परिप्रेक्ष्य में 'तिरोहित' उपन्यास | प्रा.सौ.सविता मेनकुदळे | |

RESEARCH FRONT ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446
An International Research Journal

# समीक्षेची संकल्पना आणि कार्य-
# समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीच्या अनुषंगाने

प्रा.डॉ.नितीश पांडुरंग सावंत

समीक्षा म्हटली की, ती सहसा कधी सरळ रेषेत नसतेच. ज्याची समीक्षा करावयाची ते साहित्यच मुळात व्यामिश्र, बहुरंगी असल्यामुळे समीक्षेलाही अनेक विभ्रमांनी युक्त व्हावे लागते. विविध रूपे धारण करावी लागतात. तो तिचा धर्मच बनतो. त्या त्या काळातील लोकाभिरूची, सांस्कृतिक जडणघडण, शास्त्रविशेष ज्ञानविज्ञानातील चढउतार, निर्मितीतील प्रबल वाक्षीण स्पंदने, इत्यादीमुळेही समीक्षेला विविध फांद्या फुटतात. शालेय उपदेशांपासून तो शुध्द रसपानापर्यंतच्या नाना प्रयोजनांनी, आकृतींनी साहित्य हे भरले - भारावलेले असल्यामुळे साहित्याला सामोरे जाणाऱ्या क्षेत्रातही अनेक पध्दती किंवा संप्रदाय दृढ होणे स्वाभाविक ठरते. साहित्य शास्त्राच्या सांप्रदायिक कसोटया काटेकोरपणे वापरण्यापासून ते साहित्याविषयी केवळ आत्मगत प्रतिक्रिया निखळ आणि स्वच्छंद रूपात प्रकट करण्यापर्यंत अनेक प्रकारांचा आजवर समीक्षेने अवलंब केलेला आहे. आकलन, आस्वादन, विश्लेषण, संश्लेषण, मूल्यमापन, चर्चा, चिकित्सा, तुलना, न्यायदान, गुणदोषदर्शन, विशदीकरण यासारख्या अनेक सुट्या किंवा संकुल क्रिया - प्रतिक्रियांची गजबज, समीक्षेत नेहमीच माजलेली असते. टीका, छाया, अनुवाद, मीमांसा रसग्रहण, समीक्षण, परीक्षण, परामर्थ, अभिप्राय इत्यादी आभिधानांनी ही समीक्षा ओखळली जाते. तात्विक आणि उपयोजित अशा दोन्ही स्तरावरून तिचा संचार होतो. 'व्यक्ति तितक्या प्रकृती'चा प्रत्यय समीक्षा व्यवहाराइतका अन्यत्र क्वचितच येत असेल समीक्षेवर उपलब्ध ज्ञानविज्ञान, तत्वदृष्टी, वय, वृत्ती, वातावरण यांचाही पुष्कळदा परिणाम होतो. उदा. ''एकाच काळात नियतीला महत्त्व देणारे बा. सी. मर्ढेकर जसे निर्माण होतात, तसेच श्रम व शोषणाला केंद्रस्थान

 ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

देऊन काव्यलेखन करणारे शरचंद्र मुक्तिबोधही निर्माण होतात''[१]. या दोन्ही कवींनी आपल्या भोवतीच्या सारख्याच असणाऱ्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणातून रस शोषून घेतला आहे.

आर्थिक घडामोडी, वैज्ञानिक उलथापालथी यांचाही परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या साहित्याच्या क्षेत्रावर होत असतो. लेखक धर्मानुसार, स्वभावानुसार, भोवतीच्या जीवन स्वीकाराच्या पध्दतीमध्ये बदल होत जातो याचाच अर्थ असा की, साहित्याच्या क्षेत्राला जो आकार प्राप्त होतो त्यात लेखक आणि भोवतालचे समाजवास्तव या दोघांचाही वाटा असतो.

कलेत ज्याप्रमाणे जीवनाविषयक जाणीव प्रकट होते, त्याप्रमाणे समीक्षेतही कलेबद्दलची विशिष्ट जाणकारी प्रकट व्हावयास पाहिजे. कलावंताप्रमाणे समीक्षकाचाही ''फोले पाखडून निके सत्व निवडण्याच्या बाबतीत पुढाकार असतो. कलावंताप्रमाणे समीक्षकालाही काहीप्रमाणात का होईना, सर्जनशिलतेचे वरदान लाभलेले असावे लागते. यामुळेच समीक्षाही कधी-कधी नवनिर्मितीचे रूप धारण करते. ''समीक्षक हा जवळजवळ कलावंतच असतो पण अस्सल कलावंताची सनद त्याला सहसा मिळत नाही कारण, तो जीवनाचा मूळ भाष्यकार नसून जीवनावर भाष्य करणाऱ्या कलेचा तो भाष्यकार ठरतो''[२]

आधुनिक मराठी समीक्षेच्या वाटचालीचा साकल्याने विचार करता इतर भाषातील समीक्षाप्रमाणेच मराठी समीक्षाही कालौघात स्थूलाकडून सूक्ष्माकडे, अद्भूताकडून वास्तवाकडे, बाहयाकडून अंतरंगाकडे, आश्रयाकडून अभिव्यक्तीकडे समूहाकडून व्यक्तीकडे, वर्णनाकडून विश्लेषकाकडे झुकत असल्याचे जाणवते.

साहित्याच्या सामाजिकतेचा विचार दोन प्रकारे करता येणे शक्य असते. एक प्रकार म्हणजे वर्णनात्मक रितीने व दुसरा प्रकार म्हणजे मूल्यात्मक रितीने. वर्णनात्मक पद्धतीने साहित्याच्या सामाजिकतेचा विचार करताना आपणांस समाज लेखक, वाचक, प्रकाशक, भाषा यासारख्याा घटकांचा मागोवा घ्यावा लागतो.

ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

मूल्यात्मक दृष्टीने साहित्याच्या समाजसापेक्षतेचा वेध घेताना कलात्मक मूल्ये, बांधिलकीसारखी जीवनमूल्ये साहित्याची वैश्विक प्रत्ययाकरिता यासारख्या बाबींचा परामर्श घ्यावा लागतो.

साहित्याचा अभ्यास, धर्मशास्त्रीय, समाजशास्त्रीय, राज्यशास्त्रीय, मानसशास्त्रीय, सौंदर्यशास्त्रीय यासारख्या त्याचप्रमाणे गांधीवादी, मार्क्सवादी यासारख्या विविध पध्दती रूढ आहेत. साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास हा त्याच्या सामाजिकतेचाच अभ्यास असला, तरी तो समाजशास्त्राच्या पध्दतीनुसार करण्यात येतो.

साहित्याच्या सामाजिकतेचा वर्णनात्मक रितीने वेध घेताना प्रथम समाज व साहित्य यांच्या परस्पर संबंधाचा मागोवा घ्यावा लागतो. समाजात निमार्ण होणारी प्रत्येक गोष्ट ही समाजाची काही एक गरज भागविणारी गोष्ट असते. सामाजिक गरजपूर्तीचा कारणांखेरीज समाजात काहीच निर्माण होऊ शकत नाही. यादृष्टीने साहित्य हे समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मीती असते.

साहित्य व समाज यांच्या परस्पर संबंधाला एक परिणाम असते. सामान्यपणे समाजाचे भूषण किंवा अलंकार म्हणून साहित्याकडे समाज बघत असतो. आपल्या रसिकतेचे, कलाभिरूचीचे संवर्धन करणारी एक निर्मीती म्हणून सामान्यपणे साहित्याकडे आदरपूर्वक पाहिले जाते. समाज ज्या ऐतिहासिक टप्प्यावर उभा असतो, त्या टप्प्यावर कालमानाच्या ज्या प्रेरणा असतात, त्याचा प्रभाव सामाजाच्या साहित्याविषयक भूमिकेवर पडत असतो. त्याचप्रमाणे साहित्य निर्माण करणारा जो लेखक असतो, त्याचाही सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करावा लागतो लेखक, कवी, साहित्यीक सारस्वत, कलावंत, प्रतिभावंत अशा विविध प्रकारच्या संज्ञा विकल्पाने साहित्य निर्माण करणाऱ्या व्यक्तीविषयी वापरल्या जातात. निसर्गदत्त प्रतिमा आणि साहित्याची कमी अधिक साधना ही या निर्मात्याची व्यवच्छेदक वैशिष्टये होत. एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेने, अत:स्फूर्तीने हा निर्माता साहित्य निर्माण करीत असतो. कथा, कादंबरी, कविता, नाटक यांसारख्या वेगवेगळया साहित्य प्रकारांची निर्मीती करणाऱ्या साहित्याकांच्या प्रतिमेचे स्वरूप

ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

एकसारखे नसते. त्या त्या साहित्यप्रकाराला गती व अभिव्यक्ती देणारी प्रतिमा किंवा प्रतिमाधर्म वेगळा असतो.

''लेखक समाजातच जन्मतो, जगतो व मरतो, त्यामुळे जन्मापासून तो एका अखंड सामाजिकरणाच्या प्रक्रियेने तो संस्कारित होत असतो. त्याच्या लौकीक जिण्याचे क्षेत्र समाजातच असते. लेखक म्हणून तो करीत असलेली वाङ्मयीन निर्मीतीदेखील समाजातच होते''[३] ती समाजासाठी असते. व समाजातून त्यांने घेतलेल्या जीवन विषयक अनुभवांचे अन्वयार्थ लावणारी असते. पण एवढेच नाही. माणूस ज्या समाजात जन्मतो, त्या समाजाची सगळी पूर्णपरपंरा, रूढी यांचा वारसा त्याला नकळत प्राप्त होत असतो. माणूस काहीही न आणता जन्मतो हे तितकेसे खरे नाही.'' संस्काराचे प्रंचड ओझे समाज लेखकांवर लादत असतो. जगात असामाजिक अशा गोष्टी असतीलही, पण व्यक्तीही कदापिही असामाजिक असू शकत नाही. लेखक कलावंत आपल्या अमूर्त अशा प्रतिमाशक्तीला साकार करतो. समूर्त करतो तो सामाजिक संस्कारच्या अनुभवांच्या कल्पनाच्या माध्यमातूनच लेखकांकडे एक शहाणा माणूस, साक्षेपी माणूस समाजाचा हितकर्ता म्हणून समाज सामान्यपणे बघत असतो. साहित्यिकाला सामाजिक प्रतिष्ठाही असते. समाजाला अभिमानास्पद वाटणाऱ्या अनेक गोष्टी असतात, त्यात साहित्यिकांचाही अंतर्भाव असतो. कविलेखक समाजात निर्माण झाले नसते तर समाजाच्या सांस्कृतिक परंपरेची शब्दरूप धनसंपदा कुणी निर्माण केली असती? समाज केवळ भाकरीवर जगत नाही, तर तो भाषिक निर्मीतीवरही जगत असतो. लेखकाच्या सामाजिकतेने संपन्न सांस्कृतिक परंपरा निर्माण केली आहेत व त्या अखंडपणे जनतही केल्या आहेत म्हणून समाज हा साहित्यिकाचे ऋणही मानतो व ते फेडण्याचा नानापरींने प्रयत्नही करतो.

साहित्याच्या सामाजिकतेची सर्वात महत्त्वाची बाजू म्हणजे भाषा, समाजात जी साहित्यनिर्मिती होत असते, ती अर्थातच समाजाच्या भाषेतून होत असते. आणि भाषा ही समाजनिर्मित असते. समाजाविना भाषा संभवत नाही. समाजाचा सर्व व्यवहार भाषेतून होत असतो. दीर्घकालीन अशा वापरातून भाषेचे स्वरूप सिध्द

 ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

झालेले असते. अनेक लेखकांच्या समोर त्यांचा त्यांचा एक विशिष्ट वाचकवर्ग असतो. साहित्यनिर्मीती करताना या विशिष्ट वाचकवर्गाच्या आवडीनिवडी तो कळत, नकळत जपण्याचा प्रयत्न करतो. वाचकांना अपेक्षित ते देणारे लेखक असतात नि त्यांचा अपेक्षाभंग करून धक्के देणारेही लेखक असतात. ही सर्व प्रक्रिया सामाजिकतेच्या पोटीच निर्माण झालेली असते. ''तुम्ही जुन्या नव्या वाङ्मयातील कोणत्याही घटना आणि भावना घ्या त्याची अपरिहार्यता आणि समर्थन नेहमी मानवी मुल्यांच्या संदर्भात ठरत असते. म्हणून संस्कृतीमूल्य सांस्कृतिक व्यवहार यांच्या संदर्भाशिवाय कलाकृतीचे आस्वादच अशक्य आहेत.'' ४

'' मराठी वाचकांना समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीचा परिचय १९२८ मध्ये श्री. व्यं. केतकर यांच्या ' महाराष्ट्राचे काव्यपरीक्षण' या ग्रंथामुळे झाला.''५ व्यं.श. शेजवलकर, वा.म. जोशी यांच्या लेखनामुळेही समाजशास्त्रीय समीक्षा पध्दती मराठी साहित्यात मूळ धरू लागली. समाजशास्त्रीय भूमिकेतून साहित्याची मांडणी करण्याचा पहिला प्रयत्न फ्रेंच समीक्षक व विचारवंततेन याने १८६४ मध्ये केला. आणि समाजशास्त्रीय समीक्षेची संकल्पना उदयास आली. तेनने साहित्याचा सारा व्यापार देशकाल परिस्थिती Race, Milieu, Moment या तीन घटकांच्या साहाय्याने प्रेरीत प्रवाहीत नियंत्रित होतो असा सिद्धात मांडला. साहित्य कला यांना जणू प्रयोगशाळेत नेऊन तेनने साहित्य कला यांचे पृथक्करण केले. त्यांच्या या पद्धतीचा युरोपियन व अमेरिकन साहित्य समीक्षेवर दूरगामी परिणाम झाला. याच काळात मार्क्सवादी समीक्षा विचार मांडला गेला. आणि तेनच्या सिध्दांतांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. तेनने साहित्यिक आणि त्यांचे साहित्य संपूर्णपणे ऐतिहासिक - भौगोलिक व तत्कालीन परिस्थितीचे अपत्य असते असे मानले. कलावंताच्या मधील गुणात्मक भेद त्याने लक्षात घेतला नाही. कलावंताचे कलाकृतीशी असले व्यक्तिसापेक्ष नाते त्याने विचारात घेतले नाही. समाजाचा साहित्यावर जसा परिणाम होतो तसा साहित्याचाही समाजावर काही एक प्रभाव असतो. हे तेनने लक्षात घेतले नाही. बरेसचे साहित्य प्रचलित साहित्य परंपरा, संकेत रूढी यांच्या प्रभावातून निर्माण होते या सत्याकडे तेनने दुर्लक्ष केले. परिणामी साहित्यनिर्मिती

ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

प्रक्रियेत समाज जीवनाच्या प्रभावाबरोबरच साहित्य परंपरेचाही प्रभाव असतो ही बाब तेनच्या विवेचन कक्षेतून बाद झाली आणि त्याच्या विवेचनास एकांगी रूप आले. तरीही समाजशास्त्रीय समक्षेची पायाभरणी करण्याचे ऐतिहासिक श्रेय तेनलाच जाते. समाजशास्त्रीय समीक्षा ''कलावंताच्या स्वरूपगंधात्मक अनुभूतीला त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरामुळे विशिष्टदिशा लाभते, घाट प्राप्त होतात''[६] दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, कलाकृतीच्या घटाच्या रूपाच्या साहयाने कलाकृतीमधील सररूपगंधात्मक अनुभूतीचा आस्वाद घेता येतो. अशी समाज शास्त्रीय समीक्षेची भूमिका आहे.

मार्क्सवादी समीक्षा पद्धती असे मानते की, ''साहित्याचे स्वरूप सामाजिक असल्याने समाजाच्या प्रगती - अधोगतीचा आलेख त्यात दिसणे अपरिहार्य आहे. प्लेखानोफने साहित्याची योग्यता समाजदर्शनाच्या स्वरूपावर ठरते.''[७] असे म्हटले आहे परंतु हे समाजदर्शन समाजाच्या प्रगती अधोगतीचा आलेख दर्शविणारा असावा अशी त्याची अट आहे. समाजशास्त्रीय समीक्षेकडून कुठली वाङ्मयीन भूमिका घेतली जावी तिची कार्यपद्धती कशी असावी याबद्दल अनेक अभ्यासकांकडून वेळोवेळी जी मते मांडली गेली ती लक्षात घेतली तर समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे प्रयोजन व कार्य यांच्यावर बराच प्रकाश पडू शकतो. दि.के.बेडेकरांनी समीक्षाशास्त्राचे कार्य समाजशास्त्राच्या कार्यासारखेच व्यापक असते असे सांगून पुढे म्हटले आहे की, ''प्रत्येक काळातल्या देशातल्या व वर्गातल्या कलावंताने मानवी व्यक्तित्त्वांची कोणती अवस्था व दशा मूर्त केले आहे हे सांगणे समाजाच्या विकासात कलावंताचे स्थान ठरविणें हे समीक्षाशास्त्राचे कार्य आहे व त्यासाठी समीक्षकाने समाजशास्त्राशी सहकार्य केले पाहिजे ''[८] बेडेकरांनी समाजशास्त्र आणि समीक्षाशास्त्राच्या सारखेपणावर भर दिलेला आहे. समाजशास्त्रीय समीक्षा कलाकृती आणि तिची जडण घडण करणारे सभोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक,घटक यांचे परस्पर संबंध स्पष्ट करण्याला महत्व देणारी आहे. 'परिसरनिष्ठ वास्तवाचे आकलन' हा या समीक्षा पद्धतीचा गाभा आहे. या शिवाय मानसिक पातळीवरील विचारबंध, अर्थबंध भावना युगप्रवृत्ती

ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

असे अनेक घटक समाजशास्त्रीय समीक्षेचा अभ्यास विषय बनतात. त्यामुळेच "विशिष्ट समाजरचनेमुळे निर्माण झालेले अभिप्राय सांस्कृतिक घटक आणि संघटनेचे अन्योन्य संबंध स्पष्ट करणे हे समाजशास्त्रीय समीक्षेचे मुख्य प्रयोजन आहे."[९] थोडक्यात एकंदर कलाव्यवहार विशिष्ट समाजाच्या संरचनेशी संस्कृतीशी, त्यामधील विविध घटकांशी कोणकोणत्या प्रकार संबंधित आहे हे स्पष्ट करणे समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे प्रधान कार्य आहे.

**संदर्भग्रंथ**

१. समीक्षेतील नव्या संकल्पना : संपा.- डॉ मनोहर जाधव, स्वरूप प्रका : औरंगाबाद प्र. आ. पृ. १

२. मराठी समीक्षेची वाटचाल :गो. म. कुलकर्णी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे प्र. आ. १९९८ पृ. ७

३. साहित्य विचार : संपा. : दत्तात्रय पुंडे, स्नेहल तावरे -स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे १९९६ पृ. १०१

४. जीवनवादी वाङ्‌मय समीक्षा : नरहर कुरूंदकर वसंत दिवाळी अंक १९७६ पृ ६१

५. साहित्यविचार : प्रदेश आणि परिसर - प्रकाश मेदककर, प्रतिमा प्रका. पुणे २००५ पृ. ३१

६. समाजशास्त्रीय समीक्षा : काही विचार 'नवसमीक्षा' गो.म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८२ पृ.१०६

७. मार्क्सवादी साहित्यविचार: केशव शिरवाडकर -कॉन्टिनेन्टल प्रका. पुणे १९८० पृ. ३७

८. साहित्य निर्मीती आणि समीक्षा : दि.के.बेडकर, चित्रशाळा, पुणे १९५४ पृ.२४

९. समाजशास्त्रीय समीक्षा : काही विचार 'नवसमीक्षा', गो.म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे १९८२ पृ. १०५.

 ISSN : Online : 2320-8341 ● Print : 2320-6446

१०. समीक्षेतील नव्या संकल्पना : संपा.मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२००१.

११. साहित्य विचार : अ.वा. कुलकर्णी, प्रतिमा प्रका. पुणे प्र.आ.१९९२

१२. मराठी साहित्य इतिहास : वसंत आबाजी डहाके पॉप्युलर प्रका.मुंबई. आणि संस्कृती प्र.आ. २००५.

प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत
मराठी विभागप्रमुख,
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.
ता. शिरोळ, जि.कोल्हापूर.

■■■